**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आप्पासो शंकरराव कर्नाळे
मु.पो. सरुड, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहसचिव ( उच्च शिक्षण )
रयत शिक्षण संस्था, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
रयत शिक्षण संस्था, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १५.६.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने /अपिलीय प्राधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | २३.११.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९८८ ते जून २००६ या कालावधीतील २५० विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षक रयत शिक्षण संस्था, सातारा येथे नेमणुकीबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. आप्पासो रामराव कर्नाळे, रा. सरुड, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडे अर्ज करुन रयत शिक्षण संस्था

सातारा अंतर्गत जून १९८८ ते जून २००६ या कालावधीत २५० विद्यार्थांसाठी एक शारीरिक शिक्षक नेमणेबाबत, शारीरिक शिक्षकाची नेमणूक केली असेल तर त्याबाबतचे निकष काय लावले आहेत, सद्यस्थितीत शाखावार उपलब्ध असणारी विद्यार्थी संख्या व सेवेत असणारे क्रीडा शिक्षक किती आहेत, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या दि. ७.१.२००५ व दि.२८.१२.२००५ च्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती न दिल्याने श्री. कर्नाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने आयोगाकडून क्र.रामाआ/२००७/कोल्हापूर-१०१/ अपील-०१ दि. १.११०.२००७ च्या पत्रानुसार अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे विचारणा केली होती. सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून दि. २३.११.२००७ रोजी अपीलकर्त्यास, तसेच आयोगाला सादर केलेल्या निवेदनातील खुलासा विचारात घेता असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही शिक्षक नेमणुकीच्या कार्यवाहीबाबतची आहे व सदरची माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास दिलेली आहे.

शिक्षक नेमणुकीची कार्यवाही हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २८.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला;
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बबनराव राजाराम कोकरे
मु.धुमाळवाडी, पो.पणदरे, ता.बारामती,
जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, बारामती, ता. बारामती,
जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नायब तहसीलदार, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००७ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. बबनराव राजाराम कोकरे<br>मु.धुमाळवाडी, पो.पणदरे, ता.बारामती, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, बारामती,<br>ता. बारामती, जि. पुणे<br>प्रभारी तहसीलदार श्री. बी. जे. गोरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ३.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ७.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. २२.१२.२००६ चे दोन दि. २.१.२००७, १७.३.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर तहसीलदार यांनी काय कारवाई केली याबाबत केलेल्या आदेशाच्या नकला, तहसील कार्यालय क्र. आस्था/कावि/५४२/०५ दि. ५.७.२००५ अन्वये सदर केसच्या कागदपत्रांच्या नकला.

## विवेचन

आपल्या मालकीच्या शेतजमिनीला दिले जाणारे पाटाचे पाणी पाटबंधारे खात्याने सन २००६-२००७ पासून बंद केल्याच्या संदर्भात पंचनामा करण्याची मागणी आपण तहीसलदार, बारामती यांच्याकडे दि.२२.१२.२००६ रोजी केली होती. त्यावर, तसेच दि. २.१.२००७ व दि.१७.३.२००७ रोजी दिलेल्या अर्जांवर झालेल्या कार्यवाहीची माहिती व त्या संदर्भातील पत्रव्यवहाराच्या प्रती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.बबनराव राजाराम कोकरे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, जि.पुणे यांच्याकडे केली होती. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून समाधानकारक कार्यवाही न झाल्याच्या कारणावरुन श्री.कोकरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्या मालकीच्या शेतजमीन गट क्र.३०८ व ३०९ या क्षेत्राला पूर्वीपासून पाटाचे पाणी दिले जात होते, परंतु सन २००६-२००७ मध्ये पाण्याचा पाट अस्तित्वात नाही हे कारण दाखवून पाटबंधारे खात्याने पाणीपुरवठा बंद केला आहे. तहसीलदार, बारामती यांनी याबाबत समक्ष पाहणी करुन पाट होता किंवा नाही यांबाबतचा पंचनामा करावा व पूर्ववत आपल्या शेताला पाणीपुरवठा व्हावा, ही श्री.कोकरे यांची मुख्य मागणी आहे. त्या अनुषंगाने शासनाच्या विविध पातळ्यांवर ते सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी केलेला हा अर्ज त्याचाच एक भाग आहे.

आपल्या शेताला पाणी मिळत नसल्याने उत्पन्न बुडून आपण आर्थिक अडचणीत सापडलो आहोत, म्हणून ही कार्यवाही त्वरेने व्हावी, अशी विनंती श्री. कोकरे यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. पाटबंधारे खात्याकडून आपल्याला आवश्यक ते नकाशे व पाणीपुरवठा बंद करण्याच्या कार्यवाहीच्या आदेशाच्या प्रती व अन्य कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत, आपल्या दुर्दशेची दाद घेतली

जात नाही, असेही प्रतिपादन श्री.कोकरे यांनी केले. तहसीलदार कार्यालयाने या अनुषंगाने कार्यवाही केली, परंतु ही बाब पाटबंधारे खात्याशी निगडित असून माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार (सध्या प्रभारी तहसीलदार) श्री. बी. जे. गोरे यांनी सांगितले.

शेताला पाणीपुरवठा करण्याबाबतच्या कार्यवाहीची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र तहसीलदार, बारामती यांनी या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. कागदपत्रे पाहण्यास उपलब्ध आहेत हे जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर योग्य नाही, या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्याला दिल्या पाहिजेत. तसेच पाटबंधारे खात्याने केलेल्या कार्यवाहीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रतीही अपीलकर्त्याला मिळाल्या पाहिजेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याच्या मूळ अर्जावर तहसीलदार, बारामती यांनी केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या प्रतीसह माहिती अपीलकर्त्याला दि.३०.१२.२००७ पर्यंत निःशुल्क द्यावी.

(३) पाटबंधारे खात्याने अपीलकर्त्याच्या शेताचा पाणीपुरवठा नाकारण्याबाबत केलेल्या कार्यवाहीसंबंधातील आदेश व अन्य कागदपत्रांच्या नकला संबंधितांकडून तहसीलदार, बारामती यांनी अपीलकर्त्यास दि.३०.१२.२००७ पर्यंत देण्याची व्यवस्था करावी.

क्र.२ व ३ चा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती यांनी दि. ५.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १३.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक बबनराव रगडे
मु.पो.मळवली, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मळवली,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक बबनराव रगडे
मु.पो.मळवली, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ, जि.पुणे
श्री.यु.बी.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मळवली,
ता.मावळ, जि.पुणे श्री.ए.एन.फुलपगर
तत्कालीन ग्रामसेवक श्री.जे.एन.साळुंके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br><br> मळवली, ता.मळवली, जि.पुणे येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या २००४ ते एप्रिल २००६ पर्यंतच्या जमाखर्चाचा पूर्ण अहवाल. तसेच थकबाकीदारांची यादी, पाणीपट्टी वसुली, घरकुल योजनेतील कामे, राबविलेल्या योजना इ. १४ मुद्दयांची माहिती |
|---|---|

## विवेचन

मळवली, ता.मळवली, जि.पुणे येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या २००४ ते एप्रिल २००६ पर्यंतच्या जमाखर्चाचा पूर्ण अहवाल अपीलकर्ता श्री.अशोक बबनराव रगडे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, मळवली, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडे मागितला होता. तसेच थकबाकीदारांची यादी, पाणीपट्टी वसुली, घरकुल योजनेतील कामे, राबविलेल्या योजना इ. १४ मुद्दयांची माहिती त्यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे श्री.रगडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मावळ, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु माहिती देण्यास विलंब करणाऱ्या ग्रामसेवकावर दंडात्मक कारवाई केली नाही, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणीचा केवळ देखावा केला, अशा कारणांवरुन श्री.रगडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.रगडे यांना माहितीसाठी १४०/- रुपये शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत कळविले होते, परंतु हे शुल्क त्यांनी न भरल्यामुळे त्यांना त्यावेळी माहिती दिली गेली नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जे.एन.साळुंखे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. माहिती देण्यासाठी कायद्यात तरतूदअसल्याप्रमाणे ३० दिवसांच्या मुदतीत माहिती द्यावयाची असताना श्री.रगडे यांना पत्राव्दारे दोनदा कळवूनही त्यांनी शुल्क न भरल्यामुळे विलंबाला तेच जबाबदार आहेत. संपूर्ण माहिती वेळेत तयार करुनही केवळ दबावतंत्र, आमरण उपोषण इ.धमक्या देऊन सार्वजनिक हितापेक्षा वैयक्तिक फायद्यासाठी श्री.रगडे माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करीत आहेत, असे प्रतिपादन श्री. साळुंखे यांनी लेखी व तोंडी केले.

माहिती देण्यास जवळजवळ ३० दिवस विलंब झाला असून कायद्यातील तरतुदीनुसार २५०/-रुपये प्रमाणे रु.७५००/- अशी दंडात्मक कारवाई जन माहिती अधिकाऱ्यांवर होणे शक्य होते,

परंतु ती न करता माहितीसाठी कळविलेले १४०/-रुपये हे शुल्क तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याला भरावयास सांगून तोच त्यांना केलेला दंड समजावा, असे पत्र अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.यू.बी.मोरे यांनी आपल्याला पाठविले, त्यावर त्यांनी स्वाक्षरी केलेली नाही, असा आक्षेप श्री.रगडे यांनी लेखी व तोंडी नोंदविला. कथित पत्राची छायांकित प्रत त्यांनी सादर केली. परंतु हे पत्र आपण लिहिलेले नाही, असे श्री.मोरे यांनी स्पष्ट केले. रुपये १४०/- शुल्क आपण भरलेले नाही, असे श्री.रगडे यांनी सांगितले व शुल्क न भरताच आपल्याला माहिती कशी दिली गेली, असा प्रश्न केला. शुल्क कोणी भरले याची आपल्याला कल्पना नाही, परंतु चलन दाखल केल्यामुळे माहिती देण्यास सांगितले, असे श्री.मोरे यांनी नमूद केले. सही नसलेले पत्र श्री.रगडे यांना कोणी लिहिले, शुल्क रुपये १४०/- कोणी भरले, हे उपस्थितांपैकी कोणीही स्पष्ट करु शकले नाही. याबाबत चौकशी करुन एका आठवड्यात अहवाल सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. उपरोक्त स्वरुपाचे कोणतेही पत्र कार्यालयाने अथवा अपिलीय अधिकाऱ्याने तयार केलेले नाही व तसे पत्र अपीलकर्त्यास देण्यात आलेले नाही, असा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.यू.बी.मोरे यांनी दि.१७.१२.२००७ रोजी केला आहे. अपीलकर्ता श्री.रगडे यांनी १४०/-रुपये शुल्क भरणा करण्यासाठी आपल्याकडे रोख दिले होते. ते पंचायत समिती कोषागार विभागात रोख भरणा करुन आपण दि.२१.७.२००७ रोजी श्री.रगडे यांना माहिती देऊन पोहोच आणली, असे नमूद करणारा मळवली ग्रामपंचायतीतील लेखनिक श्री. रमेश दत्तात्रय गरुड यांचा जबाब अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याच्या सोबत सादर केला आहे. तो लक्षात घेता अपीलकर्त्याने या संदर्भात केलेले आरोप सिध्द होत नाहीत.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २६.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय नामदेव सोनवणे
पंचशीलनगर, कसबा-बारामती,
ता.बारामती, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अप्पर जिल्हाधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विजय नामदेव सोनवणे, पंचशीलनगर, कसबा-बारामती, ता.बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
श्रीमती शीला पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १२.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | .५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

बारामती नगरपरिषदेत १९९४ साली नेमणूक झालेले नाका कारकून श्री. सुधीर ना.पाखरे, श्री. बाळाराम भोंडवे हे जकात खाते बंद झाल्यापासून म्हणजे १ मे १९९८ पासून परागंदा झाले असून ते नोकरी सोडून गेलेले आहेत, ते पुन्हा कामावर हजर झाले आहेत काय त्याची माहिती व नेमणुकीच्या आदेशाच्या प्रती, या कर्मचाऱ्यांची उपस्थिती, पगार, खातेनिहाय हजेरी, नोकरीवरील नगरपरिषदेचे नियंत्रण व अन्य माहिती

## विवेचन

बारामती नगरपरिषदेच्या जकात खात्यातील श्री.सुधीर ना.पाखरे व श्री.बाळाराम का.भोंडवे या कर्मचाऱ्यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात काम करण्याबाबतच्या आदेशाच्या नकला, त्यांच्या कामाचे स्वरुप इ. माहिती अपीलकर्ता श्री.विजय नामदेव सोनवणे यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, मुख्याधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने श्री.सोनवणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांच्या निकालाविरुध्द श्री.सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पाखरे व श्री.भोंडवे या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात श्री.सोनवणे माहितीच्या अधिकाराच्या कायद्याबरोबरच अन्य प्रशासकीय प्रक्रियांतर्गत अर्ज सातत्याने करीत आले आहेत व तीच माहिती पुनःपुन्हा मागत आहेत. त्यांना मिळणारी माहितीही एकाच स्वरुपाची आहे, असे आयोगापुढे करण्यात आलेल्या निवेदनांवरुन व कागदपत्रांवरुन दिसते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, जि. पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन ), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याविरुध्द याच विषयाबाबत केलेल्या अपिलावर (अपील क्र. ७५ / पुणे ) दि.२६.९.२००७ रोजी आयोगाने आदेश दिला आहे, तोच या अपिलाबाबतही लागू आहे.

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १४.१२.२००७**

अपील क्र. 135 दि 20-12-2006 रोजी आदेश निर्गमित केले
डिसेंबर 2006.

24



**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबासो मल्लाप्पा कांबळे
मु.पो.घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
१. सचिव, श्री. सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ,
घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
2 शिक्षणाधिकारी ( माध्यमिक); जिल्हा परिषद,कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक
घोसरवाड हायस्कूल, घोसरवाड ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १०.१.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २१.१.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ११.३.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री. सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळाची, घोसरवाड हायस्कूल, घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या शाळेतील सन २००५-२००६ या कालावधीतील शाळेचे वेळापत्रक तसेच सन २००५-२००६ या वर्षातील शाळेतील विषयनिहाय शिक्षकांची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाबासो मल्लाप्पा कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, घोसरवाड हायस्कूल, घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेकडे श्री. सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळाची घोसरवाड हायस्कूल, घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या शाळेतील सन २००५-२००६ या कालावधीतील शाळेचे वेळापत्रक तसेच सन २००५-२००६ या वर्षातील शाळेतील विषयनिहाय शिक्षकांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती न दिल्याने श्री. कांबळे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. तथापि श्री. कांबळे यांना अपिलाबाबतची माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.४.२००६ रोजी अपील केले. अपिलाबाबत सद्यस्थितीची विचारणा करणाऱ्या आयोगाच्या क्र.रामाआ/२००७ /अपील/कोल्हापूर १३५ दि. २९.१०.२००६ च्या पत्रास अनुसरुन १. मुख्याध्यापक, घोसरवाड हायस्कूल, घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर २. अपिलीय प्राधिकारी, तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, (माध्यमिक); जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये अपीलकर्ते श्री. कांबळे यांना माहिती दिलेली असून अपीलकर्त्याची आता काहीही तक्रार राहिलेली नसल्याचे नमूद केले आहे. श्री. कांबळे यांनी दि. २८.२.२००७ रोजी दिलेल्या तशा लेखी निवेदनाची प्रत त्यांनी सादर केली आहे.

वरील प्रमाणे आयोगापुढे सादर करण्यात आलेली वस्तुस्थिती विचारात घेता अपीलकर्त्याची आता काहीही तक्रार राहिलेली नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १९ . १२. २००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.अर्चना सुनिल अगरवाल
रा.स.नं.१०१, दोस्ती बेकरी समोर, नेहरुनगर,
पिंपरी, पुणे ४११०१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर
विकास प्राधिकरण, सेक्टर क्र.२४, निगडी, पुणे ४११०४४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्य रचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्य रचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण श्री.अनिल शंकर काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.५.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सेक्टर नं.७ व १० मधील या भूखंडासाठी तेजस्विनी महिला औद्योगिक संस्थेने अर्ज केले होते. या भूखंडामध्ये असलेल्या आरक्षणाची, तसेच दि.५.१.२००६ व त्यानंतर ८.२.२००६ पर्यंत कोणत्या संस्थेचे सदर भूखंडासाठी अर्ज आले होते, त्यांना दिलेल्या भूखंडाचा सर्व तपशील, ज्यांनी चेकद्वारे आरक्षण केले व ज्यांचे चेक परत पाठविले त्यांच्याकडून रक्कम स्वीकारुन भूखंड त्यांच्यासाठी आरक्षित केले त्याचा तपशील, तसेच नियमाप्रमाणे ज्यांना भूखंड दिले त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे. |

## विवेचन

तेजस्विनी महिला औद्योगिक संस्थेने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडे औद्योगिक भूखंड मागणीचे अर्ज केले. त्यावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्या श्रीमती अर्चना सुनिल अगरवाल यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी व विलंबाने माहिती दिली, या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडे अपील केले. माहिती देण्यास एक दिवस विलंब झाल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील शास्तीबाबतच्या तरतुदीनुसार रुपये २५०/- शास्ती लावली. परंतु माहिती नि:शुल्क द्यावयास हवी होती, ती दिली नाही, म्हणून सौ.अगरवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी एक दिवस विलंब केला असला तरी रुपये ९६०/- शुल्क भरण्याबाबतचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२४.२.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविले होते. सौ.अगरवाल यांना ते दि.१६.३.२००६ रोजी पाठविले गेले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांकडून झालेला हा विलंब लक्षात घेता अपीलकर्त्याला नि:शुल्क माहिती दिली गेली पाहिजे, मात्र सार्वजनिक प्राधिकरणाला त्याचा आर्थिक भार सहन करावा लागता कामा नये. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये शास्ती करण्याचा अधिकार प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना नाही, त्यासाठी आयोग सक्षम आहे. मात्र विलंबाची दखल तत्कालीन अपिलीय

प्राधिकारी तथा अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण यांनी घेऊन कारवाई केली हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहिती देण्यास केलेल्या एक दिवसाच्या विलंबाबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांना लावलेली रुपये २५०/- ही शास्ती जणू काही आयोगानेच लावली असल्याचे समजून तीस मान्यता देण्यात येत आहे.

(३) संबंधित अधिकाऱ्याकडून विहित मुदतीत उत्तर मिळाले असतानाही अपीलकर्त्याला ती पुरविण्यास अधिक अवधी जन माहिती अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्यामुळे कळविलेले शुल्क रुपये ९६०/- त्यांनी स्वतः भरुन अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवावी. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.५.१ .२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा. याबाबतच्या कार्यवाहीची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२८.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल सिताराम सुबंध
मु.पो.वडगावनिंबाळकर, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक (तपासणी) — उत्तरवादी
प्रकाशगड, चौथा माळा, अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व) मुंबई ५१

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अधिकारी (अ.ता.)
प्रकाशगड, चौथा माळा, अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व) मुंबई ५१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>आपल्याकडील कर्मचाऱ्याचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीने अवैध ठरविल्यानंतर आपल्या कार्यालयामार्फत कोणती कारवाई केली जाते, कारवाई किती दिवसात पूर्ण होते, कंपनीचे झालेल्या आर्थिक नुकसानीस आपले कार्यालय कोणास जबाबदार धरते, अशा कर्मचाऱ्यावर आपले कार्यालय फौजदारी कारवाई करते का, त्याची कारणे, अशा कर्मचाऱ्यास स्वेच्छानिवृत्ती घेता येते का?, घेतल्यास सेवेनंतरचे सर्व फायदे मिळतात का? कर्मचारी सेवेत असताना वेतनेतर उत्पन्न कंपनीच्या परवानगीशिवाय मिळवू शकतो का? असा कर्मचारी असेल तर त्याच्यावर कंपनी काय कारवाई करते, त्याचे अधिकार कोणास आहेत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिल सिताराम सुबंध यांनी जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (अतां आस्था), प्रकाशगड, चौथा माळा, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई यांच्याकडे वरीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. सुबंध यांनी अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, (तपासणी) प्रकाशगड, चौथा माळा, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा पूर्व मुंबई यांच्याकडे अपील केले. माहिती अपीलकर्त्यास पुरविलेली असल्याने अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी न करता अपील निकाली काढले ही बाब केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार नियमबाह्य आहे, अशा कारणावरुन श्री. सुबंध यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले निर्णय अवलोकन करता असे दिसून येते की, अपीलकर्त्याला जन माहिती अधिकारी यांनी सर्व प्रकारची माहिती पुरविलेली आहे.

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकाली काढले. मुद्दा क्र.४ मध्ये अपेक्षित माहिती स्पष्ट होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी म्हटले आहे. परंतु पदोन्नती घेणाऱ्याला किंवा देणाऱ्याला संबंधित कर्मचाऱ्याने विद्युत वितरण कंपनी मधील अनुसूचित कर्मचाऱ्यांच्या जातीचे पुरावे चोरुन दगाबाजीने किंवा फसवून घेतल्याचे जात पडताळणी समितीने सुस्पष्ट केले असल्यास अशा कर्मचाऱ्यांवर आपले कार्यालय फौजदारी कारवाई करते का, त्याची कारणे, ही अपीलकर्ता यांची मागणी स्पष्ट आहे. कारणे विचारणे हे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र अन्य माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १०.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२७.१२.२००७

# राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

क्र.अपील/कोल्हापूर/१५४,८१,८०,१०८,१४६,/०७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : २७/१२/२००७.

प्रति,

डॉ. जे.ए. कोरगावे,
रा १९१/१, आर.के.नगर,
मोरेवाडी, ता. करवीर,
जिल्हा कोल्हापूर.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जाबाबत.

महोदय,

आपण राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.५.२००६, ५.६.२००६, ९.९.२००६, २.१२.२००६ , ११.१२.२००६ व दि.११.१२.२००६ रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपीलाच्या अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, याच विषयाबाबत आपण यापूर्वी राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दाखल केलेले व्दितीय अपील मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी दि.२१ फेब्रुवारी २००७ रोजीच्या आदेशानुसार फेटाळले आहे.

या कार्यालयाकडे वर दर्शविल्या दिनांकानुसार दाखल केलेल्या व्दितीय अपीलातील व राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलातील विषय एकच असल्याने मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी दि. ०७ फेब्रुवारी २००७ रोजी दिलेले आदेश विचारात घेवून आपली या कार्यालयाकडील वरील परिच्छेद एकमध्ये नमूद केलेल्या दिनांकाची अपिले मा. आयुक्त यांच्या निदेशानुसार निकाली काढण्यात येत आहेत.

२८/१२/०७

आपला,
कापु.
(य.ह.देशपांडे)
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग,

# राज्य माहिती आयोग
# महाराष्ट्र

क्रमांक : अपिल-२००६/७४९/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २००७.

प्रति,

१. डॉ.जे.ए.कोरेगावे,
१९१/१, आर.के.नगर, मोरेवाडी,
ता.करवीर, जिल्हा कोल्हापूर.

२. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सातारा.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,
शनिवार पोष्टाजवळ, कोल्हापूर.

विषय : सुनावणीचे आदेश.

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत डॉ.जे.ए.कोरेगावे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे दालनात दि.२१ फेब्रुवारी, २००७ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश सोबत पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(रा.म.गेंगजे)
कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग.

शिरस्तेदार
त. ग्रि. ल. ७८
नगर भूमापन अधिकारी
कोल्हापूर.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक -२००७/७४४/०२

डॉ. जे. ए. कोरेगावे - अपीलार्थी
१३१/१, आर .के.नगर, मोरेवाडी.
ता.करवीर, जि.कोल्हापूर.

विरुध्द.

१. अधीक्षक -- उत्तरवादी
भूमि अभिलेख, सातारा.
२, जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी
शनिवार पोष्टाजवळ, कोल्हापूर.

--विवेचन --

डॉ. जे.ए. कोरेगावे ,मोरेवाडी, ता.करवीर. जि.कोल्हापूर यांनी आयोगाकडे दिनांक १७/४/२००६ रोजी हे द्वितीय अपील सादर केले आहे त्यासंदर्भात सुनावणी दिनांक २१ फेब्रुवारी २००७ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलकर्ते श्रीयुत. कोरेगावे, श्री.एस.व्ही.मुंढले, नगर भूमापन अधिकारी व श्री.एस.पी.शिंदे, अधीक्षक ,भूमि अभिलेख हे उपस्थित होते.

अर्जदारानी जी मुलतः नगर भूमापन अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती ती त्यांच्या कार्यालयाकडून जनतेकडे मिळकत पत्रिका व नोंद घेणे वगैरे कामासाठी पत्रव्यवहार वगैरेचा खर्च म्हणून रु.१८/- रुपयांची पोष्टाची तिकीटे घेतली जातात त्यासंदर्भात होती. ही माहिती त्यांना दि. १७/२/२००६ रोजी देण्यांत आली. याने समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १६/३/२००६ रोजी प्रथम अपील केले. अपील अधिका-यांनी सुध्दा दिलेली सर्व माहिती ही बरोबर आहे असाच निर्वाळा देवून अपील निकाली काढले. सदरचे अपील हे या निर्णयाविरुध्द आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे स्पष्ट झाले की, अर्जदारास माहिती देण्याबाबत कुठचाही कसूर झाला नाही. अर्जदारांची मुख्य तक्रार ही कायद्यात कुठेही तरतूद नसतांना किंवा वरिष्ठांकडून कुठचेही आदेश नसतांना केवळ बजेट तरतुद नाही असे कारण दाखवून जनतेकडून रु.१८/-

वी तिकीटे घेण्यात येतात, ती तिकीटे जरी वापरली जात असतील तरी त्याचा कुठचाही हिशोब ठेवला जात नाही या प्रवृत्तीविरुध्द आहे. अधिका-यांनी सांगितले की, ही पध्दत साधारणतः १ वर्षे चालू होती पण अर्जदारांच्या तक्रारीनंतर ती बंद करण्यांत आलेली आहे. या प्रवृत्तीविषयी व पध्दतीविषयी जर अर्जदार अजूनही असमाधानी असतील तर त्यांनी त्या विभागाच्या वरिष्ठांकडे तक्रार करणे हे जास्त श्रेयस्कर ठरेल. माहितीच्या अधिकारात फक्त योग्यती माहिती दिलेली आहे किंवा नाही हे बघितले जाईल, आणि त्यादृष्टीने विस्तृत माहिती ही दोन्ही अधिका-यांनी दिलेली आहे.

--आदेश--

अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश कि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक- २१ फेब्रूवारी २००७

State Information Commission
Maharashtra

क्रमांक माहिती अधिकार अपील क्रं.३४/२००६
अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर
यांचे कार्यालय
कोल्हापूर दिनांक : ३०/११/२००६

डॉ.जे.ए.कोरेगांवे
१९१/१, आर.के.नगर,
मोरेवाडी, तालुका करवीर
} अपीलदार

विरूध्द

जन माहिती अधिकारी
नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
} जाबदार

विषय : केंद्रीय माहिती अधिकारातंर्गत अपील अर्ज
संदर्भ : अपीलदार यांचा दिनांक २०/१०/२००६ चा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयांकित अपील अर्जाची सुनावणी पूर्ण इकडून दिनांक ३०/११/२००६ रोजी निर्णय दिलेला आहे. सोबत प्रत असे. सबब संदर्भीय अर्ज निकाली ठेवला आहे.

(मिलिंद चव्हाण)
प्रथम अपीलीय प्राधिकारी
अधीक्षक भूमि अभिलेख
कोल्हापूर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप मकबुल शेख
१४३, सरवदे नगर, मुळेगांव रोड,
सोलापूर - ४१३ ००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ३. | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. दिलीप मकबुल शेख, १४३, सरवदे नगर, मुळेगांव रोड, सोलापूर - ४१३ ००६

**जन माहिती अधिकारी तथा** सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री.पंचप्पा तिपण्णा कल्याणशेट्टी, अध्यक्ष, महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट यांच्याकडून कार्यालयीन नोंदणी क्र.१८७९ च्या जात दाव्याच्या प्रकरणात दाखल केलेली सर्व कागदपत्रे, तक्रारी अर्ज, पोलीस निरीक्षक, (दक्षता पथक) यांनी केलेल्या चौकशीचे अहवाल व जात पडताळणी समितीचे आदेश, अहवाल यांच्या साक्षांकित प्रती

## विवेचन

जात पडताळणी दाव्यातील कागदपत्रे, तक्रार अर्ज यांच्या साक्षांकित प्रती, पोलिस निरीक्षक (दक्षता पथक), जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे विभाग, पुणे यांच्या चौकशी अहवालाच्या साक्षांकित प्रती अपीलकर्ता श्री.दिलीप मकबूल शेख यांनी जन माहिती अधिकारी, जाती पडताळणी प्रमाणपत्र समिती, पुणे यांच्याकडे मागितली होती. या प्रकरणी समितीचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे त्या निर्णयापूर्वी ही माहिती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.शेख यांना कळविले, तेच अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे त्यांच्याविरुध्द श्री.शेख यांनी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही म्हणून श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

पुणे विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे तत्कालीन सदस्य सचीव श्री.गुणाजी सखाराम कवटे यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अशा दोन्ही अधिकारात उत्तर दिलेले दिसते. केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या प्रक्रियेशी हे विसंगत आहे.

राज्य माहिती आयोगाने प्रलंबित अपिलांच्या अनुषंगाने अपीलकर्ता व उत्तरवादी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याबाबत दि.१०.७.२००७ रोजी पत्र पाठविले होते. त्यानंतर, माहितीची पृष्ठे २३२ असल्याने प्रत्येकी रु.२ प्रमाणे ४६४/- रुपये जमा करण्यास सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री.प्रमोद जाधव यांनी श्री.शेख यांना दि.५.११.२००७ रोजी कळविले. म्हणजे माहितीची मागणी करणारा अर्ज केल्यापासून

(दि.४.४.२००६) १९ महिन्यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली गेली आहे. संबंधित प्रकरणावर समितीतर्फे निर्णयप्रक्रिया (सुनावणी) चालू होती, त्यामुळे आपण माहिती दिली नव्हती, असे तत्कालीन सदस्य सचीव व विद्यमान समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, पुणे श्री.गुणाजी सखाराम कवटे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री.जाधव यांनी आपल्याला पूर्ण सहकार्य देऊन माहिती निःशुल्क दिल्यामुळे आपली काही तक्रार राहिलेली नाही, मात्र श्री.कवटे यांनी आपल्याला माहिती मिळण्याच्या न्याय्य हक्कापासून वंचित ठेवले, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी विनंती श्री.शेख यांनी लेखी व तोंडी केली.

श्री.कवटे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावून माहिती नाकारली. त्यांचा हा निर्णय योग्य नाही, परंतु विहित मुदतीत त्यांनी उत्तर दिले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) समितीची निर्णयप्रक्रिया चालू असल्याचे कारण दाखवून माहिती नाकारण्याचा श्री.गुणाजी सखाराम कवटे यांचा निर्णय योग्य नाही, त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. माहिती देण्यास केलेल्या विलंबाबद्दल शास्ती का लावू नये याचा खुलासा श्री.कवटे यांनी दि.३०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा, त्यानंतर आयोग शास्तीबाबत निर्णय घेईल.

पुणे
दि. १७.१२.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दीपचंद भिकचंद संचेती
रा.रत्नदीप, वेताळपेठ, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीदार, तहसील कार्यालय, कर्जत,
ता.कर्जत, जि.अहमदनगर

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, उत्तरवादी
ता.कर्जत, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८+२९३+२१८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दीपचंद भिकचंद संचेती
रा.रत्नदीप, वेताळपेठ, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत,
ता.कर्जत, जि.अहमदनगर श्री.ए.पी.उजागरे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत,
ता.कर्जत, जि.अहमदनगर श्री.व्ही.बी.भापकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.१६८+२१८**<br><br>कर्जत येथील गट क्र.१६०४(जुना गट क्र.९८२), खाते क्र.३८७ मध्ये जमीन कसणाऱ्याचे नाव श्री.रामदास पंढरीनाथ शिंदे दाखल आहे. हे नाव ज्या आदेशाने दाखल झाले त्याची प्रत, तहसीलदार, मंडल अधिकारी, तलाठी यांनी केलेल्या चौकशीतील जबाबाच्या नकला, पीकपहाणी चौकशी अहवाल सन १९८६-८७.<br><br>**अपील क्र.२९३**<br><br>आरटीएस केस क्र.२/२००२ मध्ये श्री.राजेंद्र कृष्णराव पाटील इ.६ जणांचे जबाब नोंदवूनच निर्णय व्हावा. या केसमधील त्यांनी काय म्हणणे दाखल केले त्याच्या छायांकित प्रती, तलाठी श्री.पुरुषोत्तम भानुदास गाडेकर यांनी मला न कळविता सन १९९० नंतर कधीतरी श्री.रामदास पंढरीनाथ शिंदे यांची नोंद ७/१२ला घेतली, तलाठी यांची चौकशी करुन त्यांच्यावर केलेल्या कारवाईची सहीशिक्क्याची नक्कल मिळावी. |

## विवेचन

कर्जत येथील आपल्या जमिनीला श्री.रामदास पंढरीनाथ शिंदे यांच्या नावाची सन १९८५-८६ ला दाखल असलेली नोंद दुरुस्त करुन श्री.दीपचंद भिकचंद संचेती इ.पाच जणांची नोंद केली आहे. त्याबाबत तहसीलदार, कर्जत यांनी गावकामगार तलाठी, कर्जत यांना दिलेल्या आदेशाची छायांकित प्रत, तेव्हा केलेल्या पिकपहाणी चौकशी निकालाबाबतच्या तक्रारीच्या अर्जांवर केलेली कार्यवाही अशी माहिती अपीलकर्ता श्री.दीपचंद भिकचंद संचेती यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कर्जत यांच्याकडे मागितली होती. तसेच या संदर्भातील अन्य अर्जांच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीत श्री.राजेंद्र कृष्णराव पाटील इ.सहा जणांनी दिलेले जाबजबाब , कामगार तलाठी श्री.पुरुषोत्तम भानुदास गाडेकर यांच्या चौकशीच्या मागणीबाबत केलेली कारवाई या संदर्भातील माहिती श्री.संचेती यांनी मागितली होती.

पिकपहाणी चौकशी निकालाच्या अनुषंगाने ७/१२ वरील उताऱ्यावरील नाव बदलाचा विषय श्री.संचेती विविध अधिकाऱ्यांकडे व विविध स्वरुपातील अर्जांव्दारे सातत्याने मांडत आहेत, असे

आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व उभय बाजूंच्या निवेदनावरुन स्पष्ट होते. गेली २२ वर्षे आपण दाखल नोंद रद्द करुन घेण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, परंतु आपल्याला न्याय मिळत नाही, असे श्री.संचेती यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. गाव कामगार तलाठी यांनी ज्या आदेशाच्या आधारे नोंद केली त्या आदेशाची प्रत तलाठी कार्यालय, तसेच तहसीलदार कार्यालयात उपलब्ध नाही असे प्रत्येक अपिलात कळविले गेले आहे. संबंधित प्रकरणातील गैरप्रकार उघडकीस येण्याच्या दृष्टीने ती प्रत उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन श्री.संचेती यांनी केले.

श्री.संचेती यांच्या सर्व अर्जांना विहित मुदतीत उत्तर देऊन योग्य ती माहिती दिली आहे, गाव कामगार तलाठी श्री.पुरुषोत्तम भानुदास गाडेकर यांनी मनमानी करुन अवैध रीतीने दि.२५.९.१९९० नंतर कधीतरी आपल्याला न कळविता श्री.रामदास पंढरीनाथ शिंदे यांची ७/१२ ला कूळसदरी नोंद दाखल केलेली आहे, त्याची चौकशी करुन कडक कारवाई करावी, अशी श्री.संचेती यांची मागणी आहे. माहितीच्या अधिकाराखाली या कारवाईची व चौकशीची मागणी ते करीत आहेत. परंतु उपलब्ध माहिती दिली आहे व कारवाईसाठी आवश्यक वाटल्यास सक्षम अधिकाऱ्यांकडे स्वतंत्र अर्ज देऊन त्यांनी मागणी करावी, असे श्री.संचेती यांना वेळोवेळी स्पष्ट केले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार कर्जत श्री.व्ही.बी.भापकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कर्जत श्री.ए.पी.उजागरे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

उपरोक्त दाखल नोंद रद्द करावी व श्री.गाडेकर यांची आपल्या समक्ष चौकशी करावी, अशी मागणी श्री.संचेती यांनी सर्व अर्जांमध्ये केली आहे. श्री.गाडेकर तलाठी संघाचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या दबावाखाली येऊन तहसीलदार चौकशी करण्याचे टाळत आहेत, म्हणून आपण महसूल मंत्र्यांकडे दाद मागितली आहे, असेही श्री.संचेती यांनी आयोगाला दिलेल्या निवेदनात नमूद केले.

सन १९८६-८७ यावर्षी तलाठ्याने नंतरच्या नोंदी कोणत्याही आदेशाशिवाय केलेल्या असल्याने त्याच्या छायांकित प्रती देता येत नाहीत. सदरचा आदेश दप्तरी उपलब्ध नाही व सदरची केस आढळ होत नसल्यामुळे नकला देता आल्या नाहीत. असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच श्री.राजेंद्र कृष्णाजी पाटील आदींचे जाबजबाब झालेलेच नसल्यामुळे प्रती देणे शक्य नाही, असेही त्यांनी नमूद केले.

श्री.गाडेकर यांच्या चौकशीची व त्या अनुषंगाने कारवाई करण्याची श्री.संचेती यांची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र त्यांच्या जमिनीला श्री.रामदास पंढरीनाथ शिंदे यांचे नाव कूळसदरी ज्या आदेशाने दाखल झाले त्याची प्रत त्यांना दिली गेली पाहिजे. ही प्रत उपलब्ध नसल्यास ७/१२ च्या उताऱ्यातील बदल कशाच्या आधारे केला गेला, ही नोंद वैध आहे की नाही, व वैध नसल्यास योग्य नोंद काय असली पाहिजे, याची अधिकृतरीत्या माहिती मिळणे हा अपीलकर्त्याचा हक्क आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य.

(२) पिकपहाणी चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. व सक्षम अधिकाऱ्याच्या निर्णयानंतर गाव कामगार तलाठी यांनी फक्त १९८५-८६ या सालापुरतीच नोंद दुरुस्त करण्याच्या कारणांबाबतची माहिती व त्या अनुषंगाने तहसीलदार, कर्जत यांनी केलेली कार्यवाही, नोंदीची वैधता/अवैधता व नियमानुसार आवश्यक असलेले नोंदीचे स्वरुप याची माहिती अपीलकर्त्यास सुनावणीच्या तारखेपासून १५ दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कर्जत यांनी दि.३१.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपीलकर्त्यास द्यावयाची राहिलेली माहिती त्वरित द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २०.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजकुमार संदिपान जाधव
रा.मु.पो.महूद बु., ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजकुमार संदिपान जाधव
रा.मु.पो.महूद बु., ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर उत्तरवादी
श्री.दिलीप झेंडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी, पंढरपूर श्री.अ.पां.बरडे
तालुका कृषी अधिकारी, सांगोला, ता.सांगोला,
जि.सोलापूर श्री.व्ही.एस.बंडगर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.६.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.६.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>तालुका कृषी कार्यालय, सांगोला या कार्यालयामार्फत सांगोला तालुक्यात रोजगार हमी योजनेतून करण्यात आलेल्या शेततळ्याच्या कामाची पगारपत्रके व अंदाजपत्रके इत्यादी माहिती. |

## विवेचन

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सांगोला या कार्यालयामार्फत सांगोला तालुक्यात रोजगार हमी योजनेतून केलेल्या शेततळ्याच्या कामाची पगारपत्रके, अंदाजपत्रके इ. माहिती अपीलकर्ता श्री.राजकुमार संदिपान जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, सांगोला व उपविभागीय कृषी अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे मागितली होती. जानेवारी २००३ ते एप्रिल २००५ या कालावधीतील माहिती मागणाऱ्या या अर्जाची या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही म्हणून श्री.जाधव यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. मूळ अर्ज हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला होता. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्याने महाराष्ट्राचा कायदा रद्द झाला असल्याचे कारण देऊन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी हा अर्ज निकाली काढला. नंतर श्री.जाधव यांनी केलेल्या अर्जावरील अपिलाच्या सुनावणीत अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी श्री.जाधव यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांसाठी १,१४,२६५/- रुपये खर्च येणार असल्याचे स्पष्ट केले. तालुका कृषी अधिकारी, सांगोला यांच्याकडे एवढा निधी उपलब्ध नसल्याने कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढता आलेल्या नाहीत, वरिष्ठ कार्यालयाकडे निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली असून तो प्राप्त होइपर्यंत श्री.जाधव यांना संबंधित अभिलेखाची पाहणी समक्ष करु द्यावी व अनुदान प्राप्त होताच छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण शुल्क भरण्यास तयार असून आपल्याला ते कळविणे जाणे आवश्यक होते. संबंधित खर्च अर्जदाराकडून शुल्काच्या रुपात घेऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदाराला माहिती देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. असे असताना कार्यालयाकडे संबंधित निधी उपलब्ध नसल्याचे

कारण दर्शवून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी तालुका कृषी अधिकारी, सांगोला व उपविभागीय कृषी अधिकारी, पंढरपूर यांच्याशी संगनमत करुन दिशाभूल केली म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी व आपल्याला माहिती मिळावी, अशी मागणी श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील हे अपील असून आपल्याला तेव्हा कायद्याची पूर्ण कल्पना नव्हती असे अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर श्री.दिलीप झेंडे, तालुका कृषी अधिकारी, सांगोला श्री.व्ही.एस.बंडगर व उपविभागीय कृषी अधिकारी, पंढरपूर श्री.अ.पां.बरडे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. अर्जावरील शुल्क घेतल्यानंतर ती रक्कम शासकीय कोषागारात चलनाने भरली जाते. अर्जदाराने मागितलेली माहिती विस्तृत असल्यामुळे कागदपत्राच्या छायांकित प्रती करण्यासाठी येणारा १,१४,२६५/-रुपये एवढा खर्च करण्याएवढा निधी संबंधित कार्यालयात उपलब्ध नाही. चलनाने कोषागारात भरलेली रक्कम कार्यालयाला मिळत नाही, त्यामुळे अशा स्वरुपाची व्यापक प्रमाणावरील कागदपत्रे देताना निधीचा प्रश्न येतो, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर श्री.दिलीप झेंडे यांनी स्पष्ट केले. त्यांची अडचण रास्त आहे.

निधीबाबतचा असा प्रश्न अन्य काही अपिलांबाबतही आयोगापुढे उपस्थित झाला आहे. तो लक्षात घेता शासनाने त्यावरील नेमकी उपाययोजना ठरविणे आवश्यक आहे. संबंधित शासकीय कार्यालयाकडील माहिती पुरविण्यासाठी येणारा खर्च त्या कार्यालयाला करावा लागतो व चलनाने भरली जाणारी रक्कम शासकीय कोषागारात जमा होते. ती त्या कार्यालयाला कामासाठी निश्चित केलेली अंशी नसते. त्यामुळे अशा संदर्भातील कार्यवाहीबाबत शासनाने निश्चित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेली अडचण रास्त आहे. मात्र सर्वच अर्जांबाबत व सर्वच सार्वजनिक प्राधिकरणांबाबत हा निकष सरसकट लागू करता येणार नाही, हेही आयोग स्पष्ट करीत आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे ते माहिती पुरवू शकले नाहीत. मात्र पूर्ण माहिती तयार

असल्याचे त्यांनी आयोगापुढे कागदपत्रांसह स्पष्ट केले. संपूर्ण अभिलेखाची पाहणी समक्ष करु देण्याची व्यवस्था करण्यात आली होती, हेही अपिलीय प्राधिकारी यांनी या संदर्भात नमूद केले.

ही अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेता अर्जदाराला नि:शुल्क माहिती देणे आवश्यक नाही. अर्जदाराला माहिती मिळावी व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाला निधीची अडचण जाणवू नये यासाठी अपीलकर्त्याने कागदपत्रांच्या छायांकनाचा खर्च स्वतः करावा, अशी आयोगाची सूचना आहे. अर्जदाराने ही स्थिती मान्य केली व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती स्वखर्चाने करुन घेण्याची तयारी दर्शविली.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याने छायांकनाचा खर्च स्वतः करुन आवश्यक कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात. दि.१४.१२.२००७ रोजी ही प्रक्रिया पूर्ण व्हावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

(३) माहिती पुरविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला (शासकीय खाते, कार्यालय यांना) कागदपत्रांच्या छायांकनासाठी विशिष्ट प्रमाणाबाहेर खर्च येत असल्यास अशा खर्चाच्या तरतुदीबाबत योग्य ती उपाययोजना शासनाने करावी, असे मुख्य सचीव, महाराष्ट्र शासन यांना सुचविण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**पुणे**
**दि. १८.१२.२००७**

प्रत::मुख्य सचीव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना लक्षवेध व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास भीमराव मोरे,
रा. भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २५.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १२.९.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १६.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २९.९.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री. मोरे यांच्या मुलाला त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर कार्यालयामध्ये शिपाई पदावर नियुक्ती देणेबाबत | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबुराव हरिभाऊ जाधव
रा.श्रीहरी निवास रामनगर (पश्चिम),
कोल्हापूर रोड, सांगली, ता.मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१,
मिरज तालुका पंचायत समिती, मिरज, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बामणोली,
ता.मिरज, जि.सांगली उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबुराव हरिभाऊ जाधव
रा.श्रीहरी निवास रामनगर (पश्चिम),
कोल्हापूर रोड, सांगली, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१,
मिरज तालुका पंचायत समिती, मिरज, जि.सांगली
श्री.एम.एस.यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बामणोली,
ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.जी.माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन १९९६-९७/९७-९८/९८-९९ या काळातील ग्रामसेवक असताना रु.३४४३१६.२५ इतके येणे माझ्याकडे दाखविले आहे. एवढी प्रचंड रक्कम कोणत्या आधारे येणे दाखविली त्याची अधिकृत कागदपत्रे मिळणेबाबत. | |

## विवेचन

बामणोली ग्रामपंचायत, ता.मिरज, जिल्हा सांगली येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करीत असतानाच्या काळातील रुपये ३,४४,३१६.२५ ही रक्कम आपल्याकडून कोणत्या आधारे येणे दाखवली त्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.बाबुराव हरिभाऊ जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, बामणोली यांच्याकडे मागितली होती. मुख्यतः शासकीय लेखा परीक्षण अहवाल श्री.जाधव यांना अपेक्षित होता. जन माहिती अधिकारी श्री.एस.जी.माने यांनी कोणतीही माहिती दिली नाही म्हणून, श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१ श्री.एस.एस.यादव यांच्याकडे अपील केले, परंतु त्यांनी अपीलाची दखल घेतली नाही. म्हणून श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जाधव बामणोली ग्रामपचांयतीचे ग्रामविकास अधिकारी असतानाच्या काळातील हा विषय आहे. श्री.जाधव यांनी माहिती मागितल्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.एस.जी.माने यांनी त्यांना रुपये २०००/- शुल्क आवश्यक प्रतींसाठी भरण्यास ८४ दिवसांनी कळविले. परंतु ३० दिवसांच्या मुदतीत आपल्याला माहिती मिळाली

नसल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी, माहिती विलंबाने देणाऱ्या जनमाहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी व अपिलाची दखल न घेणारे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.जाधव यांनी अपिलात केली आहे.

श्री.जाधव यांनी माहिती मागितली तेव्हा लेखा परीक्षणाचे काम चालू होते, म्हणून आपण अहवाल देऊ शकलो नाही, असे श्री.माने यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. परंतु आपल्या कालावधीतील आर्थिक व्यवहाराची संपूर्ण दप्तर तपासणी तत्कालीन विस्तार अधिकारी श्री.रामचंद्र पांडुरंग मोहिते यांनी करुन दिलेल्या अहवालानुसार आपण पंचायतीस कोणतेही देणे लागत नाही. असे असताना आपल्याकडून येणे बाकी कशाच्या आधारे दाखवली, ती माहिती मिळावी, असे प्रतिपादन श्री.जाधव यांनी केले. लेखा परीक्षण आता पूर्ण झाले असून सात दिवसात माहिती देऊ, असे श्री.माने यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी श्री.माने यांनी श्री.जाधव यांच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात. तसेच अपिलीय प्राधिकारी श्री.यादव यांनी विहित मुदतीत अपिलाची दखल घेतलेली नाही हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचा भंग आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहिती मागणीच्या अर्जाची दखल घेण्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.एस.जी.माने यांनी ८४ दिवस विलंब केला आहे. लेखा परीक्षण पूर्ण झालेले नसले तरी त्यांनी तसे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविणे आवश्यक होते. ते कळविण्यास विहित_मुदतीपेक्षा ५४ दिवस विलंब झाला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० मधील तरतुदीनुसार विलंबाच्या प्रत्येक दिवसास रुपये २५०/- प्रमाणे ५४ दिवसासाठी रुपये १३,५००/- शास्ती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.एस.जी.माने यांना लावण्यात येत आहे. ही रक्कम श्री.माने यांच्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २००८ या

तीन महिन्यांच्या वेतनातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी श्री. एम. एस. यादव यांनी करुन तसा पूर्तता अहवाल आयोगास पाठवावा. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांची ही जबाबदारी राहील.

(३)अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्याचा पूर्तता अहवाल दि.१०.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि.२७.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. दिलीप मल्हारराव पाटील
४०८, मंगळवार पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक; आरोग्य सेवा,
कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१ / सातारा |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १२.६.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २७.७.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सेवाविषयक बाबींची मागणी | |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, यांच्याकडे सेवाविषयक बाबींसंबंधात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची मागणी दि. १२.९.२००७ रोजी केली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्यसेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांचेकडे दि. २७.७.२००७ रोजी अपील दाखल केले. परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने कोणतीही माहिती अपीलकर्त्यास न दिल्याने दि. १७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलाच्या अनुषंगाने दि. ७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाने केलेल्या विचारणेस अनुसरुन श्री. पाटील यांनी दि. २०.११.२००७ रोजी लेखी निवेदनाद्वारे अपेक्षित माहिती प्राप्त झाली असल्याबद्दल कळविले आहे. तसेच याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांनीही अपीलकर्त्यास आवश्यक माहिती दि. २०.११.२००७ रोजी दिली असल्याचे आयोगास कळविले आहे. सदरहू बाबी पाहता आता अपीलकर्त्याची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे आढळून येते.

वरील बाबी विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २०.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मोती मथरानी
रा.प्लॉट क्र.२१, सिंध हिंदू को ऑप.हौसिंग सोसायटी प्रा.लि.,
लुल्लानगर, पुणे ४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम(पश्चिम)विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय मोती मथरानी
रा.प्लॉट क्र.२१, सिंध हिंदू को ऑप.हौसिंग सोसायटी प्रा.लि.,
लुल्लानगर, पुणे ४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा श्री.एस.बी.रोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)विभाग, सातारा श्री.मधुकरराव लक्ष्मणराव कटकधोंड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>ठेकेदार म्हणून केलेल्या कामाबाबत डांबर पुरवठा केल्याचे प्रपत्र, २००२-२००४ मधील हिशेब तपासणी अहवाल व कार्यकारी अभियंता यांची उत्तरे इ.८ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती, डांबर पुरवठ्याचा तारीखवार तपशील व अन्य २५ मुद्द्यांची होय/नाही अशा स्वरुपातील उत्तरे, त्याबाबतचे भाष्य/स्पष्टीकरण |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय मोती मथरानी हे बांधकाम ठेकेदार असून त्यांनी केलेल्या कामाच्या संदर्भात डांबर पुरवठा केल्याचे प्रपत्र, कामाचा हिशेब तपासणी अहवाल व २००२-२००४ मधील हिशेब तपासणी अहवाल व कार्यकारी अभियंता यांची उत्तरे इ.८ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती, डांबर पुरवठ्याचा तारीखवार तपशील व अन्य २५ मुद्द्यांची होय/नाही अशा स्वरुपातील उत्तरे, त्याबाबतचे भाष्य/स्पष्टीकरण अशी माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम(पश्चिम) विभाग, सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडील व अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीनंतरही अपुरी, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली जात असल्याचे कारण नमूद करुन श्री.मथरानी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री.मथरानी यांना कामाबाबतचे आदेश सन १९९४-९५ मध्ये मिळाले होते. काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे त्यांच्याकडून काही रक्कम वसूल केली गेली, त्याबाबत वाद व न्यायालयात श्री.मथरानी यांनी केलेला दावा दाखल आहे.

योग्य प्रतीचे, आवश्यक तेवढे व आवश्यक तेव्हा डांबर व अन्य साहित्य आपल्याला पुरविले गेले नाही. त्यामुळे आपले काम दिलेल्या मुदतीत पूर्ण झाले नाही. याला संबंधित अधिकारी जबाबदार आहेत, असे श्री.मथरानी यांचे म्हणणे आहे. परंतु ठेकेदाराने मागणी केल्यानंतरच डांबर व अन्य साहित्याचा पुरवठा केला जातो, असे जन माहती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. आपण मागणी केल्याप्रमाणे पुरवठा झाला नसल्याचे पुरावे आपल्याकडे आहेत, तसेच अधिकाऱ्यांनी आपल्याला दिलेल्या कागदपत्रांमध्ये नोंदीत तफावत

दिसते, म्हणजेच दिलेली माहिती खरी नाही, असे प्रतिपादन श्री.मथरानी यांनी केले. परंतु ७-८ वर्षांपूर्वी झालेले काम असून त्यावेळच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या नोंदीनुसार असलेली माहिती आपण दिली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. श्री.मथरानी यांनी विशिष्ट तक्ते व नमुने देऊन त्यानुसारच माहिती मिळावी, अशी मागणी केली आहे. त्या नमुन्यात अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली नाही. मात्र ती सर्व माहिती असलेली कागदपत्रे दिली आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा श्री.मधुकर लक्ष्मणराव कटकधोंड यांनी नमूद केले. होय / नाही अशा स्वरुपात सर्व माहिती देता येणार नाही, तसेच भाष्य वा स्पष्टीकरण देणे शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांचे हे म्हणणे रास्त आहे. संपूर्ण कागदपत्रांमधून श्री.मथरानी यांना अपेक्षित असलेल्या नोंदी त्यांनी एकत्रित कराव्यात, अशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची अपेक्षा दिसते, ती योग्य नाही. श्री.मथरानी यांनी नमूद केलेल्या दिनांकानुसार त्यांना केलेल्या डांबर पुरवठ्याचा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या नमुन्यात देणे आवश्यक आहे. माहिती म्हणून दिलेल्या काही कागदपत्रांवर कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसल्याचे श्री.मथरानी यांनी निदर्शनास आणले. अशी स्वाक्षरी असणे किंवा जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीचे पत्र त्यासोबत असल्याशिवाय त्याला अधिकृतपणा येणार नाही, हा त्यांचा आक्षेप रास्त आहे.

श्री.मथरानी यांच्याकडील काम वेळेत पूर्ण न होण्यास कोण जबाबदार आहे, अधिकाऱ्यांनी पुरविलेले डांबर आवश्यक त्या प्रतीचे होते की नाही, अशा स्वरुपाचे प्रश्न केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाहीत. त्यामुळे त्याबाबतचा निर्णय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेबाहेरील आहे.

परंतु त्यांना शासनाकडून पुरविल्या गेलेल्या डांबर आदि साहित्याचा तपशील त्यांनी नमूद केलेल्या तारखांनुसार दिला गेला पाहिजे. हा तपशील दि.१४.१२२००७ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार संबंधित कागदपत्रांची तपासणी करुन प्रपत्रामध्ये माहिती भरुन देण्यात आली आहे, असे नमूद करुन कार्यकारी अभियंता यांच्या वतीने श्री.व्ही.ए.पाटसकर यांनी श्री.मथरानी यांना माहिती पुरविल्याचे दि.१३.१२.२००७ रोजी (प्राप्त दि.१९.१२.२००७) आयोगाला कळविले आहे.

परंतु ही माहिती अपुरी, चुकीची असून कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या अभिलेखातील या संदर्भातील काही माहिती दडविली आहे असे निवेदन श्री.मथरानी यांनी आयोगाला सादर केले आहे. परंतु यात नेमके काय चुकीचे आहे व काय दडविले आहे, हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. केवळ शेरेवजा भाष्य ग्राह्य मानता येणार नाही.

उभय बाजूंचे निवेदन व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यांकडून दि.१३.१२.२००७ रोजी दिल्या गेलेल्या माहितीत कोणता तपशील द्यावयाचा राहिला आहे, याचे निवेदन अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करावे, त्याची एक प्रत आयोगाला सादर करावी. संबंधित माहितीतील तपशील राहिला असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी तो अपीलकर्त्यास त्वरित निःशुल्क पुरवावा. मात्र 'माहिती ' म्हणून भाष्य अगर विश्लेषण अपीलकर्त्यास मागता येणार नाही.

(३) डांबर पुरवठ्याबाबत अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली तारीखवार माहिती पूर्ण दिली गेली आहे, त्यातील तपशील दडविला गेलेला नाही, याबाबत जन माहिती अधिकारी श्री.मधुकर लक्ष्मणराव कटकधोंड यांनी आयोगाला प्रतिज्ञापत्र दि.५.१.२००८ पर्यंत सादर करावे.

याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.मधुकर लक्ष्मणराव कटकधोंड व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री.एस.बी.रोडे यांनी दि.१०.१ .२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २०.१२.२००७**